महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:- १४४२/(अ)/मशिसेमविप/२०१७/२४ दिनांक :- ०६ जुलै,२०२३

## -: सुधारित प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** :- महाराष्ट्र शिक्षण सेवा ( प्रशासन शाखा) गट ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मुलाखत कार्यक्रम

**संदर्भ** :- (१) जाहिरात क्रमांक ४०/२०१७
(२) आयोगाचे दिनांक २३ जून व २७ जून, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ परीक्षेचा निकाल दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या तसेच विविध न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयाने/न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशानुसार मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ११ ते १४ जुलै, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आल्याचे संदर्भाधीन प्रसिद्धीपत्रकान्वये जाहीर करण्यात आले होते. तथापि, प्रशासकीय कारणास्तव मुलाखतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आलेला आहे.

| मुलाखत दिनांक | मुलाखतीचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|
| दिनांक १२ ते १४ जुलै, २०२३<br>दिनांक १८ ते २० जुलै, २०२३ | त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नं ३४ सरोवर विहार समोर सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४ | सकाळी ०९ : ०० वा. |

**३.** मुलाखतीचा तपशीलवार सुधारित कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येणार आहे. मुलाखतीच्या सुधारित कार्यक्रमाच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांनी मुलाखतीकरिता विहित दिनांकास व विहित वेळेवर उपस्थित राहावे.

**४.** सुधारित मुलाखत पत्र उमेदवारांच्या प्रोफाईलवर स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येईल.

ठिकाण: नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर अराजपत्रित )
महाराष्ट्र लोकसेवा आयोग